# ग्राहकांसाठी 'अदानी'चा डिजिटलवर भर

## व्हिडीओ कॉंटॅक्ट, गुगल असिस्टंट आणि स्मार्ट वीजमीटर मिळणार

मुंबई, ता. २९ : ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी अदानी इलेक्ट्रिसिटीने डिजिटल माध्यमांवर भर दिला आहे. लवकरच अदानीतर्फे व्हिडीओ कॉंटॅक्ट सेंटर, ॲलेक्सा व गुगल असिस्टंटचा व्हॉईस बोट प्लॅटफॉर्म, स्मार्ट वीजमीटर आदी वैशिष्ट्यपूर्ण सेवा आणल्या जातील.

अदानीच्या पाच विभागांमध्ये ९० स्वयंसहायता किऑस्क मशीन असून ग्राहक तेथे स्वतःचे व्यवहार स्वतःच करू शकतात. तेथे बिले भरणे, तक्रार नोंदवणे, बिलाची प्रत घेणे, व्हिडीओ कॉल सेंटरवर तक्रार नोंदवणे आदी कामे करता येतात. त्यांच्या कस्टमर मोबाईल ॲपमार्फतही अशी सर्व कामे करता येत असून त्यातून बिलांचा आणि वीजवापराचा तपशीलही पाहता येतो. स्मार्ट मीटर, चॅटबोट एलेक्ट्रा, अत्याधुनिक पेमेंट किऑस्क आदी माध्यमातून भविष्यात संपर्करहित (कॉंटॅक्टलेस) वापर करण्याच्या दिशेने वाटचाल होत आहे, असे अदानी इलेक्ट्रिसिटीच्या प्रवक्त्याने सांगितले. माहितीसाठी संपर्क : www.adanielectricity.com.

### अशा आहेत नवीन सेवा

१ पहिलेवहिले व्हिडीओ कॉंटॅक्ट सेंटर. ग्राहकांना सर्व सेवा घरात बसून व्हर्च्युअल पद्धतीने एजंटशी संपर्क साधून उपलब्ध करून घेता येतील. ग्राहक त्यांच्या सोयीने व्हिडीओ कॉंटॅक्ट सेंटरच्या अधिकाऱ्याची वेळ घेऊ शकतील. अदानीच्या मोबाईल ॲप, संकेतस्थळ तसेच चॅटबोट एलेक्ट्राच्या माध्यमातून ग्राहक कॉल करू शकतील.

२ अदानीच्या ॲलेक्सा व गुगल असिस्टंटच्या व्हॉईस बोट प्लॅटफॉर्मवर अनेक भाषांमधून व्यवहार होतील. अदानीच्या सर्व सेवा एका ध्वनी आदेशावर (व्हॉईस कमांड) उपलब्ध होतील. अशी सेवा मुंबईतील ग्राहकांसाठी लवकरच सुरू केली जाईल.

३ मुंबईतील ग्राहकांना लवकरच सात लाख स्मार्ट मीटर मिळणार असून त्यामुळे ग्राहकांना आपल्या वीजवापरावर लक्ष ठेवता येईल.